जो सभासद अगोदरच्या सलग पाच वर्षातील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहिला नसेल आणि अगोदरच्या सलग पाच वर्षामध्ये बँकेच्या पोटनियमामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे किमान एकदा बँकेच्या सेवांचा लाभ घेतला नसेल अशा सभासदास अक्रियाशिल सभासद म्हणून वर्गीकरण केल्याचे सदर आर्थिक वर्ष समाप्तीनंतर ३० दिवसांचे आत संबधीत सभासदास पत्र पाठवून कळविले जाईल.

जो अक्रियाशिल सभासद नंतरच्या सलग पाच वर्षातील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणार नाही आणि बँकेच्या पोटनियमामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे किमान बँकेच्या सेवांचा लाभ, वापर करणार नाही त्याला कायद्याच्या कलम ३५ नुसार निष्कासित करण्यात येईल.

जो सभासद अक्रियाशिल सभासद म्हणून वर्गीकत झाला आहे त्याला परत क्रियाशिल सभासद होईपर्यंत बँकेच्या कोणत्याही सवलतीचा लाभ मिळणार नाही.

सभासद क्रियाशिल आहे अथवा अक्रियाशिल आहे याबद्दल मतभेद निर्माण झाल्यास याबाबतचे अपील निबंधकाकडे अशी सुचना मिळाल्यापासून ६० दिवसांचे आत करता येईल.

कायद्यामधील सदर दुरुस्ती प्रसिध्द झाल्यानंतर लगेचच ज्या बँकांची निवडणूक होणार आहे अशा बँकांच्या सर्व सभासदांना जोपर्यंत ते क्रियाशिल सभासद म्हणून वर्गीकृत केले जात नाही तोपर्यंत त्या सभासदास मतदानाचा अधिकार राहील.

**१३. सभासदत्वाचा अर्ज व त्याबाबतची कार्यवाही :**

अ) सामान्य सभासदत्वासाठी अर्जदाराने बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यात रु.१००/- इतक्या प्रवेश फीसहीत अर्ज सादर केला पाहिजे. अर्जदारांने त्याबरोबरच बँकेच्या शंभर भागाची रक्कम रु.२,५००/- अर्ज सादर करतांना भरली पाहिजे.

ब) जे अर्ज सर्व दृष्टीने पूर्णपणे भरलेले आहेत व योग्य त्या रक्कमेचा भरणा केलेला आहे. अशा अर्जावर बँकेतर्फे अर्ज मिळालेपासून ९० दिवसांचे आत निर्णय घेतला जाईल व असा निर्णय घेतल्यापासून ६० दिवसाचे आत तो अर्जदारास कळविला जाईल.

**१४) क्रियाशिल सभासद :**

क्रियाशिल सभासद म्हणजे अशी व्यक्ती जिला सामान्य सभासद म्हणून प्रवेश दिला आहे आणि

अ) जो सभासद अगोदरच्या सलग पाच वर्षातील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित राहिला आहे.

ब) ज्या सभासदाने अगोदरच्या सलग पाच वर्षामध्ये बँकेच्या पोटनियमामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे किमान एकदा बँकेच्या सेवांचा लाभ घेतला आहे.